This Question Paper consists of 37 questions and 11 printed pages.
ह्या प्रश्नपत्रिकेत एकूण 37 प्रश्न आणि 11 छापील पाने आहेत.

Roll No. / अनुक्रमांक

Code No. / कोड नं. **67/S/A/M**

SET/सेट **A**

# MARATHI

# मराठी

# (204)

Day and Date of Examination :
(परीक्षेचा दिवस आणि तारीख) ______________________

Signature of Invigilators :
(निरीक्षकाची सही) 1. ______________________

2. ______________________

**सामान्य अनुदेश :**

1. **सर्व** प्रश्नांचे उत्तर तुम्हाला दिलेल्या उत्तर-पुस्तिकेतच लिहायची आहेत.
2. या प्रश्न-पत्रिकेला वाचण्यासाठी 15 मिनिटाचा वेळ दिला गेला आहे. प्रश्न-पत्रिकेचे वितरण दुपारी 02.15 वाजता करण्यात येईल. 02.15 ते 02.30 पर्यंत विद्यार्थी केवळ प्रश्न-पत्रिका वाचतील आणि या वेळेत उत्तर-पुस्तिकेत कोणतेही उत्तर लिहणार नाहीत.
3. परीक्षार्थीने प्रश्नपत्रिकेच्या प्रथम पृष्ठावर आपला अनुक्रमांक लिहावा.
4. कृपाकरून प्रश्न–पत्र तपासून घ्या की पुस्तकाचे एकंदर पृष्ठ आणि प्रश्नांची संख्या प्रथम पृष्ठावर सर्वात वर छापलेली आहे, तेवढीच आहे किंवा नाही. तसेच प्रश्नांची संख्यापण क्रमिक रुपात असावी.
5. बहुपर्यायी प्रश्नांचे उत्तर लिहिताना दिलेल्या पर्यायांपैकी अचूक पर्याय (अ), (ब), (क) किंवा (ड) निवडून उत्तरपत्रिकेत लिहा.
6. बहुपर्यायी प्रश्नांचे उत्तर देतांना तुम्हाला दिलेल्या पर्यायांतून योग्य तो पर्याय निवडावयाचा आहे. वेगळी देण्यांत येणाऱ्या उत्तर–पुस्तिकांमधे योग्य उत्तर लिहायचे आहे.
7. बहुपर्यायी प्रश्नांचे सोबतच सर्व प्रश्नांची उत्तरे निर्धारित वेळेतच द्यावयाची आहेत. बहुपर्यायी प्रश्नांसाठी जास्त वेळ देण्यांत येणार नाही.
8. उत्तर–पत्रिकेत ओळख निदर्शनास आणणे आणि योग्य जागेच्या व्यतिरिक्त अनुक्रमांक लिहिल्यास परीक्षार्थीला अयोग्य ठरविण्यांत येईल.
9. आपल्या उत्तर–पत्रिकांवर प्रश्न–पत्रिकेचा कोड नं. **67/S/A/M-A** लिहावेत.



Unnati Educations
9899436384, 9654279279

# MARATHI
# मराठी
# (204)

वेळ : तीन तास ] [ एकूण गुण : 100

**सूचना :** (i) या प्रश्नपत्रिकेत एकूण 37 प्रश्न आहेत आणि सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(ii) प्रश्नपत्रिकेत दोन विभाग आहेत. **विभाग – अ** आणि **विभाग – ब**.

(iii) **विभाग – अ** मध्ये वस्तुनिष्ठ/बहुपर्यायी प्रश्न आहेत तर **विभाग – ब** मध्ये विषयनिष्ठ/वर्णनात्मक प्रश्न आहेत. **विभाग – अ** 50 गुण व **विभाग – ब** 50 गुण आहेत. = 100 गुण.

(iv) **विभाग – अ** मध्ये एकूण 27 प्रश्न आहेत.

- प्रश्न क्र. 1 ते 12 गद्य
- प्रश्न क्र. 13 ते 20 पद्य
- प्रश्न क्र. 21 ते 27 व्याकरण

(v) **विभाग – ब** मध्ये एकूण 28 ते 37 प्रश्न आहेत.

- प्रश्न क्र. 28 ते 30 गद्य–पद्य
- प्रश्न क्र. 31 ते 32 व्याकरण
- प्रश्न क्र. 33 ते 34 उताऱ्यावरील प्रश्न
- प्रश्न क्र. 35 ते 37 लेखन कौशल्यावर आधारित उदा. निबंधलेखन, पत्रलेखन व सारांशलेखन इ.

## विभाग – अ (वस्तुनिष्ठ/बहुपर्यायी प्रश्न)

दिलेल्या पर्यायांमधून **अचूक** पर्याय शोधून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

**1.** हेगडेवारांचे वैद्यकीय शिक्षण कोठे झाले? **1**

(अ) नागपूर (ब) कोलकाता (क) यवतमाळ (ड) मुंबई

**किंवा**

लक्ष्मीबाई टिळकांचे मराठीतील गाजलेले पुस्तक कोणते?

(अ) श्यामची आई (ब) गणगोत (क) बनगरवाडी (ड) स्मृतिचित्रे

**2.** नागू गवळ्याचा हातखंडा विषय कोणता होता? **1**

(अ) खाणे (ब) वाचणे (क) पळणे (ड) झोपणे

**किंवा**

आपल्याला ज्ञान देणारा पहिला गुरु कोण?

(अ) ग्रंथ (ब) पिता (क) माता (ड) शिक्षक



Unnati Educations
9899436384, 9654279279

**3.** महात्मा जोतीबा फुले यांचे पूर्ण नाव सांगा. **1**

(अ) जोतीराव गोविंदराव फुले (ब) गोविंदराव जोतीराव फुले

(क) गोविंदराव केशवराव फुले (ड) जोतीराव केशवराव फुले

**किंवा**

इंग्रजांच्या अरेरावीच्या विरोधात जे बेत आखले गेले त्याचे अग्रणी कोण होते?

(अ) माधव (ब) मुख्याध्यापक

(क) केशव व त्याचे सवंगडी (ड) केशव

**4.** चूक की बरोबर सांगा. (**कोणतेही तीन**) **3**

(a) दिलीप धारुरकर यांनी लिहिलेल्या पाठाचे नाव पर्वतशिखर आहे. **1**

(b) इंग्रजी भाषेचा परिचय मराठी माणसांना झाला हे टिळकांना सुचिन्ह वाटले नाही. **1**

(c) नागू गवळी अंगाने गुटगुटीत होता. **1**

(d) महर्षी कर्वे यांना महाराष्ट्र भूषण हा किताब मिळाला होता. **1**

**5.** रिकाम्या जागा भरा. (**कोणत्याही तीन**) **3**

(a) महर्षी कर्वे यांनी वयाच्या __________ वर्षी आपला देह ठेवला. **1**

(b) __________ नागू गवळी दिसत असे. **1**

(c) डॉ. केशव बळीराम हेगडेवार यांनी __________ या संघटनेची स्थापना केली. **1**

(d) बालपणी लेखकाला 'श्री' ही सरस्वतीच्या मंदिरातील __________ वाटली होती. **1**

(e) लोकमान्य टिळकांनी __________ हे नियतकालिक / वृत्तपत्र चालू केले. **1**

**6.** जोड्या लावा – **पाठ** आणि **पाठाचे लेखक** यांच्या जोड्या लावा. **4**

| **'अ' गट (पाठ)** | | **'ब' गट (लेखक)** | |
|---|---|---|---|
| (a) झोप | – | आचार्य विनोबा भावे | **1** |
| (b) तू तर माझ्याही | – | वि.स. खांडेकर | **1** |
| (c) मातृशक्तीचे महत्त्व | – | लक्ष्मीबाई नारायण टिळक | **1** |
| (d) श्री | – | द.मा. मिरासदार | **1** |



**Unnati Educations**
**9899436384, 9654279279**

7. दिलेल्या पर्यायांमधून **अचूक** पर्याय शोधून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. **2**

(a) निबंधमालेतील पहिला निबंध __________ हा होता. **1**

(अ) स्वधर्म आणि स्वभाषा (ब) केसरीचे महत्त्व

(क) मराठी भाषेची स्थिती (ड) मातृभाषा

(b) तल्लीन होणे म्हणजे __________. **1**

(अ) एकरूप होणे (ब) दु:खी होणे (क) व्याकुळ होणे (ड) विरक्त होणे

8. टिळकांच्या मते आपण मराठी भाषेचा स्वीकार केला, कारण __________ **1**

(अ) ती इंग्रजीपेक्षा चांगली आहे.

(ब) मराठी भाषा आपल्याला आवडते.

(क) ती आपल्याला जन्माबरोबर प्राप्त झाली आहे.

(ड) मराठी भाषा बोलणाऱ्यांची संख्या खूप आहे.

9. लग्नानंतर नागूला दिवसा झोप लागत नसे, कारण __________ **1**

(अ) त्याच्या मागे प्रपंच लागला होता.

(ब) घरात मुलांचा गोंधळ होता.

(क) त्याला व्यायामाला वेळ द्यायचा होता.

(ड) त्याची बायको त्याला झोपू द्यायची नाही.

10. आधुनिक भारतामधला अण्णा हे एक अद्‌भुत चमत्कार होते, म्हणजे : **1**

(अ) अण्णांनी आयुष्यात खूप चमत्कार केले.

(ब) अण्णा एकशेपाच वर्षे जगले.

(क) ते इतिहासातील क्रांतिकारक होते.

(ड) जे जे मनोरथ त्यांनी रचले ते पूर्ण झालेली पाहण्यासाठी त्यांना निरामय दीर्घायुष्य लाभले.



Unnati Educations
9899436384, 9654279279

**11.** इंद्रिय निग्रह म्हणजे __________ **1**

(अ) इंद्रियावर संयम ठेवणे. (ब) आग्रह करणे.

(क) स्वैराचार करणे. (ड) इंद्रियांचे दमन करणे.

**12.** लग्नपत्रिकेला __________ लावलाच पाहिजे, हा लेखकाचा आग्रह आहे. **1**

(अ) तांदूळ (ब) कुंकुमतिलक (क) डिंक (ड) केशर

**13.** दिलेल्या पर्यायांमधून **अचूक** पर्याय शोधून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. **1**

बलसागर भारत होवो या कवितेचे कवी कोण?

(अ) त्र्यंबक बापूजी ठोमरे (ब) पांडुरंग सदाशिव साने

(क) विष्णू वामन शिरवाडकर (ड) ग.दि. माडगूळकर

**किंवा**

कवी कुसुमाग्रज यांनी कोणाला प्रश्न विचारला?

(अ) आकाशाला (ब) परमेश्वराला (क) नक्षत्रांना (ड) मुक्तप्रवाशाला

**14.** पसायदान म्हणजे काय? **1**

(अ) गीतेचा अर्थ (ब) अभंग रचना (क) प्रसादाचे दान (ड) परमभक्ती

**किंवा**

तळ्यातील बदके कशी होती?

(अ) छोटी (ब) सुरेख (क) पांढरी (ड) यापैकी एकही नाही

**15.** चूक की बरोबर सांगा. (**कोणतेही तीन**) **3**

(a) निसर्गातील सहा ऋतुंचे सहा सोहळे पाहून कवीला निराशा येते. **1**

(b) वीरपत्नी आपल्या पतीच्या भाळी विजयतिलक लावणार आहे. **1**

(c) सूर्य हे ज्ञानाचे प्रतीक नाही. **1**

(d) बलसागर भारत होवो या कवितेची मध्यवर्ती कल्पना म्हणजे भारताला वैभवसंपन्न बलशाली करणे होय. **1**



Unnati Educations
9899436384, 9654279279

**16.** रिकाम्या जागा भरा. **(कोणत्याही तीन)** 3

(a) इथे __________ जन्मा येती.

(b) पिल्लास दुःख भारी, भोळे रडे, __________.

(c) __________ तिमिर जावो.

(d) या जन्मावर, या जगण्यावर शतदा __________.

**17.** **कविता** आणि **कवी** यांच्या जोड्या लावा. 4

| **'अ' गट (कविता)** | | **'ब' गट (कवी)** |
|---|---|---|
| (a) पहा टाकले पुसुनी डोळे | – | कुसुमाग्रज |
| (b) पाऊलचिन्हे | – | मंगेश पाडगांवकर |
| (c) या जगण्यावर | – | नामदेव ढसाळ |
| (d) आता | – | शांता शेळके |

**18.** दिलेल्या पर्यायांमधून **अचूक** पर्याय शोधून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

रणांगणी जा सुखे राजसा, या ओळीत कोणता अलंकार वापरला आहे? 1

(अ) अनन्वय (ब) अनुप्रास (क) यमक (ड) रूपक

**19.** 'आता' ही कविता कवी नामदेव ढसाळ यांच्या कोणत्या कवितासंग्रहातून घेतली आहे ? 1

(अ) गोलपिठा (ब) झेंडूची फुले (क) पत्री (ड) विशाखा

**20.** ज्ञानेश्वरांनी विश्वात्मके हे विशेषण कोणासाठी वापरले ? 1

(अ) प्राण्यांसाठी (ब) देवासाठी (क) मुलांसाठी (ड) फुलांसाठी

**21.** दिलेल्या पर्यायांमधून **अचूक** पर्याय शोधून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. 1

ज्या शब्दांचा वाक्यात उपयोग करताना लिंग, वचन आणि क्रियापद यात कोणतातरी बदल होतो, तेव्हा त्याला __________ शब्द असे म्हणतात.

(अ) अविकारी (ब) नाम (क) विकारी (ड) सर्वनाम

**किंवा**

त्राण न राहणे या वाक्प्रचाराचा अर्थ __________.

(अ) शक्ती न राहणे (ब) उसंत न मिळणे

(क) संयम न राहणे (ड) इच्छा न राहणे



Unnati Educations
9899436384, 9654279279

**22.** शब्दांच्या एकूण जाती किती ? **1**

(अ) आठ (ब) चार (क) दोन (ड) पाच

**किंवा**

घरावर मांजर बसले आहे. या वाक्यात वर हे __________ आहे.

(अ) नाम (ब) क्रियापद (क) शब्दयोगी अव्यय (ड) सर्वनाम

**23.** चूक की बरोबर सांगा. (**कोणतेही तीन**) **3**

(a) भाषा ही विचार, भावना व्यक्त करण्याचे प्रभावी साधन आहे. **1**

(b) दोन व्यक्ती किंवा संस्था यांच्यात दळणवळण आणि संवाद निर्माण करणारे पत्र हे प्रभावी माध्यम आहे. **1**

(c) दोन शब्द किंवा दोन वाक्ये जोडणाऱ्या अविकारी शब्दांना क्रियापद म्हणतात. **1**

(d) जेव्हा क्रियापदावरून क्रिया आता घडते असे समजते तेव्हा तो वर्तमानकाळ असतो. **1**

**24.** दिलेल्या पर्यायांतून **अचूक** शुद्ध शब्द ओळखा : (**कोणतेही तीन**) **3**

(a) (अ) तिमीर (ब) तिमिर (क) तीमीर (ड) तीमर

(b) (अ) दूंदुभी (ब) दुंदुभी (क) दुंदुंभि (ड) दूंदूभी

(c) (अ) अनिश्चीत (ब) अनिश्चित (क) अनीश्चित (ड) अन्निश्चित

(d) (अ) क्षितीज (ब) क्षीतीज (क) क्षितिज (ड) क्षीतिज

**25.** दिलेल्या पर्यायांमधून **अचूक** पर्याय शोधून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. **3**

(a) शेतकऱ्याला <u>वारंवार</u> कोर्टात जावे लागते. या वाक्यातील अधोरेखित शब्दास काय म्हणतात?

(अ) क्रियापद (ब) क्रियाविशेषण अव्यय

(क) केवलप्रयोगी अव्यय (ड) विशेषण

(b) नामाबद्दल विशेष माहिती सांगणाऱ्या शब्दास __________ म्हणतात.

(अ) क्रियापद (ब) विशेषण (क) क्रियाविशेषण (ड) सर्वनाम

(c) पाटी आणि पेन्सिल हे या द्वंद्व समासाचे उदाहरण आहे :

(अ) इतरेतर (ब) समाहार (क) वैकल्पिक (ड) द्विगू



Unnati Educations
9899436384, 9654279279

26. सूचनेप्रमाणे लिहा. 2

पुढे दिलेल्या शब्दसमूहाला एक शब्द सुचवा.

(a) शंभर वर्षे आयुष्य जगणारा.

(b) गुप्त बातम्या काढणारा.

**किंवा**

पुढीलपैकी **कोणत्याही एका** म्हणीचा अर्थ सांगून स्वतःच्या वाक्यात म्हणीचा वापर करून लिहा.

(a) पी हळद हो गोरी

(b) कामापुरता मामा

27. खालील शब्दांच्या विरुद्धार्थी शब्दांत जोड्या जुळवा. 2

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | आदर | (i) | अनुत्तीर्ण |
| (b) | उपकार | (ii) | नास्तिक |
| (c) | उत्तीर्ण | (iii) | अनादर |
| (d) | आस्तिक | (iv) | अपकार |

## विभाग – ब (विषयनिष्ठ/वर्णनात्मक प्रश्न)

28. खालीलपैकी **कोणत्याही तीन** प्रश्नांची उत्तरे 20 ते 30 शब्दांत लिहा. 6

(a) भाषा विकासासाठी लोकमान्य टिळक तरुणांकडून कोणत्या अपेक्षा करतात?

(b) शास्त्रात आईचा गौरव कोणत्या शब्दांत केला आहे?

(c) नागूला दिवसभरात झोपायला का मिळत नसे?

(d) खाऊचा पुडा केशवने कचराकुंडीत का टाकून दिला?

29. खालीलपैकी **कोणत्याही तीन** प्रश्नांची उत्तरे 20 ते 30 शब्दांत लिहा. 6

(a) अंधार वाहून वाहून कोण पोक्या झाले?

(b) वेलीवर उमलणारे फूल कवीला कसे वाटते?

(c) कवीने पिल्लाच्या दुःखाचे वर्णन कसे केले आहे?

(d) कवी सोन्याचा दिवस लवकर उगवो, अशी मनोकामना का प्रकट करतो?



Unnati Educations
9899436384, 9654279279

**30.** खालीलपैकी **कोणत्याही तीन** प्रश्नांची उत्तरे 30 ते 50 शब्दांत लिहा. **9**

(a) लेखकाला 'श्री' मध्ये काय दिसले ?

(b) घरी आलेली बाई हिंदू किंवा ख्रिस्ती आहे याचा अंदाज लक्ष्मीबाईंना का आला नाही ?

(c) बदकाच्या उदाहरणातून कवीने मानवी स्वभावाचे कोणते विशेष सांगितले ?

(d) तिन्ही लोकांसाठी ज्ञानेश्वरांनी कोणती प्रार्थना केली आहे ?

**31.** रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा. **4**

(a) (i) पक्ष्यांचा __________ **2**

(ii) द्राक्षांचा __________

**किंवा**

'खडे फोडणे' या वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

(b) खालील शब्दाचे प्रत्येकी दोन समानार्थी शब्द लिहा. **2**

(i) समुद्र __________ __________

(ii) बक्षीस __________ __________

**32.** कंसातील सूचनेनुसार प्रश्न सोडवा. **4**

(a) मी बाहेर पडलो आणि पावसाला सुरुवात झाली. **1**

(या वाक्यातील उभयान्वयी अव्यय शोधून लिहा.)

(b) नामाऐवजी येणाऱ्या शब्दाला __________ म्हणतात. **1**

(रिकामी जागा भरा.)

**किंवा**

या आदेशाला 'रिस्ले सर्क्युलर' असे म्हणत.

(या वाक्यात वापरलेली विरामचिन्हे लिहा.)

(c) खालील वाक्यातील काळ ओळखा. **2**

(i) सुधाने आंबा खाल्ला.

(ii) मी उद्या मैदानावर खेळायला जाणार.



Unnati Educations
9899436384, 9654279279

**33.** खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा. **3**

अहिंसा हे एक फार मोठे मूल्य आहे. नाइलाज झाल्याशिवाय हिंसा करूच नये, अशी भारतीय संस्कृतीची शिकवण आहे. पण हिंसा म्हणजे तरी काय ? प्राण घेणे, जिवानिशी मारणे किंवा दुसऱ्याला शारीरिक इजा करणे एवढीच हिंसेची व्याप्ती आहे ? नाही दुसऱ्याचे मन दुखावणे, टोचून बोलणे, अपमान करणे, हिणवणे, आनंद हिरावून घेणे ही सारी हिंसेचीच रूपे आहेत. भारतात महात्मा गांधींनी अहिंसेचा मोठा प्रयोग केला. बलाढ्य ब्रिटिश सत्तेला अहिंसेने जेरीस आणले. इतकी वर्षे तुरुंगात डांबून ठेवलेले नेल्सन मंडेला विजयी झाले. दक्षिण आफ्रिकेतील कृष्णवर्णीयांना आता न्याय मिळू लागला आहे. ब्रिटिश माणसाबद्दल द्वेष किंवा तिरस्कार न वाटता, त्यांच्या राजवटी विरुद्ध लढा द्यायला गांधीजींनी शिकवले.

**प्रश्न :**

(a) हिंसेची कोणकोणती रूपे उताऱ्यात दिली आहेत ?

**किंवा**

गांधीजींनी ब्रिटिशसत्तेला कशाच्या जोरावर नमवले ?

(b) नेल्सन मंडेला यांनी कुणाला न्याय मिळवून दिला ?

**किंवा**

भारतीय संस्कृतीची शिकवण कोणती ?

(c) गांधीजींनी काय शिकवले ?

**34.** खालील पद्यांश वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा. **3**

चंद्रमौळी झोपडीच्या माथ्यावर चंद्र आला
त्याच्या सोनकिरणांनी तिचा राजवाडा झाला
ठावे झोपडीला बाई, तिचे झोपाचे छप्पर
भिंती शेणकुडांच्या नी दार वाजे करकर
उजळले किरणांनी तिचे सारवले अंग
दिसे अंगण चंदनी त्याच्या कवडश्यासंगं

(a) चंद्र कोठे आला आहे ?

**किंवा**

झोपडीला कशाची उपमा दिली आहे ?

(b) झोपडीचा राजवाडा का झाला ?

**किंवा**

झोपडीचे छप्पर कशाचे आहे ?

(c) झोपडीचे अंगण कसे दिसत आहे ?


Unnati Educations
9899436384, 9654279279

35. पुढील उताऱ्याचा सारांश एक तृतीयांश शब्दांत तुमच्या भाषेत लिहा व उताऱ्याला योग्य शीर्षक द्या. **4**

एका टेकडीवर खूप उंचीवर माझी खोली होती. विपुल नैसर्गिक सौंदर्याने नटलेला तो परिसर होता. खारी, साप, निरनिराळ्या प्रकारचे विंचू हे माझ्या खोलीत नेहमी यायचे. विविध रंगाची फुलपाखरे आणि विविध तऱ्हांचे पक्षी हे माझे तेथील सोबती बनले. माझ्याविषयी एक प्रकारची आत्मीयता त्यांना वाटत असावी, असे दिसते. नेहमी दूर राहूनच ते आपल्या सुंदर सहवासाचा आनंद मला देत. अशा शुद्ध, सात्त्विक वातावरणात साहजिकच मी आध्यात्मिक क्षेत्राकडे वळलो. दररोज केवळ एक वेळ भाजी व भात एवढा स्वयंपाक आणि अर्धा तास टकळीवर सूत कातण्यात जेवढा वेळ जाईल तेवढा वेळ वजा जाता सर्व वेळ मी चिंतनात, ध्यानमग्न अवस्थेत घालवू लागलो. या दृष्टीने पंधरा महिन्यांचे माझे तेथील वास्तव्य मला अत्यंत लाभदायी ठरले.

36. तुमच्या मित्राला वक्तृत्व स्पर्धेत उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले आहे, त्याचे अभिनंदन करणारे व प्रोत्साहन देणारे पत्र लिहा. **5**

**किंवा**

तुमच्या परिसरात डासांचा उपद्रव वाढला आहे, त्याच्या बंदोबस्तासाठी आयुक्त, महानगरपालिका, आरोग्य विभाग यांच्याकडे तक्रार अर्ज लिहा.

37. खालीलपैकी **एका** विषयावर **150** ते **200** शब्दांत निबंध लिहा. **6**

(a) इंटरनेट (महाजाल) शाप की वरदान

(b) मला पंख फुटले तर.......

(c) जुन्या वृक्षाचे मनोगत

(d) माझा आवडता सण

- o 0 o -



Unnati Educations
9899436384, 9654279279